पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या विनंती बदलासाठी (Change Request) व इतर कामांसाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-३/पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक
दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक : ३१ मार्च, २०१८

<u>वाचा :</u>

१) शासनाचे क्रमांक आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१७.९.२०१३ चे इरादा पत्र (Letter of Intent)
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसएस-१०१२/प्र.क्र.७१/विशा-४, दि.१४.१०.२०१३
३) महाराष्ट्र शासन आणि मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. यांचे दरम्यान दि.२८.१०.२०१३ रोजी झालेला करारनामा.
४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५
५) शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७
६) मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दि.१७.१.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
७) पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखालील दि.२८.०६.२०१७ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) बैठकीचे इतिवृत्त.
८) मे.एडीएसएल कंपनीने दि.२९.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेली देयके.
९) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.४.१०.२०१७ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
१०) मे. प्राईसवॉटरहाऊस कूपर्स कं. यांचा दि. ०५.१२.२०१७ रोजीचा ई-मेल.
११) गृह विभाग, शासन निर्णय क्र.सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-३/पोल-३, दि.२६.०३.२०१८.

<u>प्रस्तावना</u> :-

पोलीस आयुक्त, पुणे यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये सीसीटीव्ही प्रकल्प राबविण्याबाबत मे.अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि. कंपनीला दि. १७.९.२०१३ रोजी इरादापत्र (Letter of Intent) देण्यात आले होते. संदर्भाधीन क्र. २ येथे नमुद गृह विभाग, शासन निर्णय दि.१४.१०.२०१३ अन्वये सदर प्रकल्पास व त्यासाठी येणाऱ्या संभाव्य रु.२२५ कोटी (रुपये दोनशे पंचवीस कोटी फक्त) इतक्या रक्कमेच्या खर्चाच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात

आली आहे. संदर्भ क्र.३ येथे नमुद करारनाम्यानुसार सदरहू कंपनीला देय असणारी रक्कम एकरकमी देय न करता, पुढील ६ वर्षाच्या कालावधीमध्ये (म्हणजेच प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर २०% आणि उर्वरित ८०% रक्कम २० समान हप्त्यामध्ये) अदा करणे बंधनकारक आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाचे काम पुर्ण झाले असुन सदर प्रकल्प दि.२७.१०.२०१५ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला आहे. पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत (अतिरिक्त खांब उभारणे, खांब स्थलांतरित करणे, पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरांचे एकात्मिकरण करणे व पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही व्हीवींग सेंटर स्थलांतरित करणे इत्यादीबाबत) या कामांची देयके प्रकल्प संचालक (SI) मे.एडीएसएल कंपनीने सादर केली असून ती अदा करण्याची विनंती दि.२९.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे. पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या अध्यक्षतेखालील दि.२८.०६.२०१७ रोजीच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) बैठकीत तसेच अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दिनांक १७.०१.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रकल्प अंमलबजावणी समितीस (PIC) रु.५० लाखापर्यंतच्या मर्यादेत अतिरिक्त कामाबाबत/Change Request बाबत निर्णय घेण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तथापि उपरोक्तप्रमाणे नमूद कामे/Change Request ही पुणे शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या कामाच्या व्याप्तीबाहेरची कामे असल्याने सदर कामांना उपरोक्त संदर्भाधिन क्र.११ येथे नमूद दिनांक २६.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने सदर कामांची देयके प्रकल्प संचालक (SI) मे.एडीएसएल कंपनीस अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

पुणे व पिंपरी-चिंचवड शहर सीसीटीव्ही प्रकल्पाच्या Change Request/अतिरिक्त कामांसाठी (अतिरिक्त खांब उभारणे, खांब स्थलांतरित करणे, पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही कॅमेरांचे एकात्मिकरण करणे व पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही व्हीवींग सेंटर स्थलांतरित करणे इत्यादी कामांसाठी) एकूण रुपये ६४,३३,६३२/-(रु.चौसष्ट लाख तेहतीस हजार सहाशे बत्तीस) एवढी रक्कम प्रकल्प संचालक मे.अलाईड डिजीटल सर्विसेस लि. कंपनीला अदा करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च हा "मागणी क्र. बी-१०, ४०५५- पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) योजनेतर योजना - ५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरहू रक्कम आहरीत करण्यासाठी पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना नियंत्रक अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यास येत आहे. त्यांनी रुपये ६४,३३,६३२/-(रु.चौसष्ट लाख तेहतीस हजार सहाशे बत्तीस) एवढया रकमेचा धनादेश अलाईड डिजीटल सर्विसेस लि. कंपनीच्या कोटक महिंद्रा बँक, नरीमन पॉईन्ट शाखा, मुंबई यांचेकडील **ESCROW Account No.02312436713, IFSC:KKBK0000958** या खात्यावर जमा करावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागाला असलेलया अधिकारान्वये तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र. क्र. ३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु.क्र. २७ अ, नियम क्र.७६ अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये तसेच मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीच्या दिनांक १७.०१.२०१७ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार व अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर देयक पुणे सीसीटीव्ही प्रकल्पाच्या करारनाम्यात नमूद केल्यानुसार यासाठी लागू असलेल्या सर्व प्रचलीत कर व इतर वजाती वसूल करुन अदा करण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११२२९०३२६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kailas A. Gaikwad

Digitally signed by Kailas A. Gaikwad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a708cc03eb46cd241a604d42bb, cn=Kailas A. Gaikwad
Date: 2018.03.31 12:30:50 +05'30'

(कैलास गायकवाड)

उपसचिव, गृह विभाग

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३. मा. राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे.
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र ½, मुंबई/नागपूर
१०.आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे.
११. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पुणे.
१२.जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. मे. अलाईड डिजिटल सर्व्हिसेस लि., प्रिमाईसेस नं. १३-ए, १३ वा मजला, अर्नेस्ट हाऊस, बॅकबे रेक्लेमेशन, एनसीपीए रोड, ब्लॉक III, नरीमन पाईंट, मुंबई-२१.
१४. वित्त विभाग, व्यय-७/ वित्तीय सुधारणा.
१५. अवर सचिव, अर्थ-२, गृह विभाग.
१६. निवडनस्ती, पोल-३.

*****